( श्रीराम सर्वेकर व. ३ विरुध्द लक्ष्मी राणे व. ५)

**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र.२९/२०१६ नि. ३२ वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज वादी यांनी ते हजर करीत असलेले कागदपत्र याकामी हजर करुन ते पुराव्याकामी वाचणेत यावे यासाठी दाखल केलला आहे.

०२. वादीचे कथन असे की, याकामी न्यायालयात विशेष कुलमुखत्यारपत्राची मुळ प्रत हजर करत असून सदरची प्रत हजर करणेस परवानगी मिळावी यासाठी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादींनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादींचे म्हणणे असे की, कुलमुखत्यारपत्र हजर करण्याची योग्य वेळ नाही. सबब सदर अर्ज नामंजुर करण्यात अशी विनंती वादींनी केलेली आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचून पाहीले, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले, तसेच उभय पक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी सदर अर्जाच्या फेरीस्तासोबत दाखल केलेले कागदपत्र अनुक्रमांक १ हे दिनांक २५/०२/२०२४ रोजी भावना श्रीराम सर्वेकर यांनी श्रीराम दत्तात्रय सर्वेकर यांना लिहून दिलेल्या कुलमुखत्यारपत्राची मुळ प्रत आहे. भारतीय पुरावा कायद्यान्वये ज्या पक्षकारांनी कागदपत्रे हजर केली त्या पक्षकारांनी त्यातील मजकुर व सदरील कागदपत्र शाबीत करण्याची जबाबदारी ही सदर पक्षकारांवर असते. त्यामुळे सदरचे दस्तऐवज हे दाव्याचे कामी अभिलेखावर सामिल करुन घेतल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही. त्यामुळे सदर दस्तऐवज सामिल करुन घेता येईल. परंतु, सदरील दस्तऐवज शाबीत केल्यानंतर त्यास निशाणी क्रमांक देणे उचित होईल. तसेच भारतीय पुरावा कायद्यात दस्तऐवज संबंधीचे दिलेली गृहितके सदरची कागदपत्रातील मजकूर शाबीत झाला किंवा कसे हे अंतिम युक्तीवादाचे वेळी विचारात घेता येईल. त्यामुळे सदर दस्तास अभिलेखावर

दाखल करुन घेण्याची परवानगी देणे मला उचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. ३२ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. नि.३३ च्या फेरीस्तासोबतचे कागपत्र अभिलेखावर हजर करुन घेण्यात येत आहेत.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.04.03 17:51:34 +0530

दिनांक– ०२/०४/२०२४ (प.रा.ढोरे )

ठिकाण– कुडाळ. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ.